# अमेरिकेतून टपालाद्वारे गांजा मागवणाऱ्या दोघांना अटक

**मुंबई :** अमेरिकेतून टपालाद्वारे गांजा मागवल्याच्या आरोपाखाली सीमा शुल्क विभागाने मुंबईतून दोघांना अटक केली. या प्रकरणी ११५



ग्रॅम उच्च प्रतीचा गांजा जप्त करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे १० लाख रुपयांहून अधिक आहे. ते खरेदी करण्यासाठी बिटकॉइन या कूट चलनाचा वापर करण्यात आल्याचा संशय आहे.

यश कलानी (२८) व सुकेतू तळेकर (४६) अशी अटक आरोपींची नावे आहेत. हे दोघेही वांद्रे येथील रहिवासी आहेत. तळेकर रेस्टॉरन्ट मालक आहे. मुंबईतील परदेशी टपाल कार्यालयात अमेरिकेमधून आलेल्या पाकिटामध्ये गांजा असल्याची माहिती सीमा शुल्क विभागाला मिळाली होती. त्यानुसार सीमा शुल्क विभागाकडून आझाद नगर टपाल कार्यालयात ते पार्सल अडवण्यात आले. त्या संशयित पाकिटाचा माग काढला. त्या वेळी तेथील कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन सर्व प्रकार सांगण्यात आला. त्यानुसार बनावट टपाल तयार करून संबंधित पत्त्यावर सीमा शुल्क अधिकारी पोहोचले. तेथे सीमा शुल्क विभागाने दोघांना अटक केली. आरोपींविरोधात यापूर्वीही अमली पदार्थप्रकरणी मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे सूत्रांनी सांगितले. नऊ किलो गांजाप्रकरणी २०२० ला अमली पदार्थविरोधी पथकाने गुन्हा दाखल केला होता. त्या वेळी जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत १ कोटी ६२ लाख रुपये होती.

# पुराणातील वानग्यांच्या पुस्तिका संकेतस्थळावरून हटवल्या

## वाद उद्भवल्यानंतर 'एनसीईआरटी'ला उपरती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'चंद्रयान-३' मोहिमेची महती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) प्रकाशित केलेल्या पुस्तिकांमध्ये समाविष्ट केलेल्या पुराणातील वानग्या वादग्रस्त ठरल्यानंतर पुस्तिका संकेतस्थळावरून हटवण्यात आल्या आहेत.

चंद्रयान मोहीम कशी यशस्वी झाली याची माहिती देण्याच्या उद्देशाने 'एनसीईआरटी'ने अवांतर वाचनासाठी पुस्तिका प्रकाशित केल्या होत्या. त्या परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होत्या. 'वैदिक काळात भारतात विमाने, उडणारी वाहने यांचा शोध लागला होता. देव-देवता रथ वापरत होते आणि ते रथ उडू शकत होते. त्यांचा वापर देव पृथ्वी, स्वर्ग, अंतराळात फिरण्यासाठी करत असत. विश्वकर्माने सूर्याच्या धुलीकणांपासून तयार केलेले पुष्पक विमान रावणाचे वाहन होते, अशा आशयाचे उल्लेख पुस्तिकांमध्ये होते. यावरून वाद उद्धवल्यानंतर परिषदेने सोमवारी त्या संकेतस्थळावरून हटविल्या.




'एनसीईआरटी'च्या पुस्तिकांबाबत 'लोकसत्ता'च्या सोमवारच्या अंकात प्रसिद्ध झालेले वृत्त.



## ब्लॅक टेल्ड् गॉडविट मुंबईत

सायबेरिया, रशियामधून हजारो संख्येने 'ब्लॅक टेल्ड गॉडविट' या पक्ष्यांचे थवे मुंबईत दाखल झाले आहेत. सध्या त्यांचे मुंबईतील ठाणे खाडी, खारघर, भांडुप पंपिंग स्टेशन, टी.एस. चाणक्य अशा ठिकाणी दर्शन होत आहे. दरवर्षी जुलै ते सप्टेंबर आणि मार्च ते मे या कालावधीत हे पक्षी स्थलांतर करतात. इतर पक्ष्यांप्रमाणेच हिवाळ्यातील कठोर तापमानाची स्थिती आणि अन्नाचा तुटवडा यापासून बचाव करण्यासाठी 'गॉडविट' दरवर्षी दहा हजार किमीचा अंतर कापून स्थलांतर करतात.

### गोगलगायींमुळे राज्यातील एक लाख शेतकऱ्यांना फटका

# दीड कोटी शेतकऱ्यांना दहा हजार कोटींची मदत

**विकास महाडिक, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्यात मागील दोन वर्षात झालेल्या अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि कीटकांचा हल्ला यामुळे दीड कोटी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून त्यांना सरकारच्या वतीने दहा हजार ३०० कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. गेल्या वर्षी जून ते ऑक्टोबर या पाच महिन्यात ६२ लाख ९४ हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीपिकांचे नुकसान झाले असून ८४ लाख ९५ हजार ९८७ शेतकऱ्यांना या



अतिवृष्टी, सततचा पाऊस व पीकांवर लागलेल्या कीडीमुळे नुकसान सोसावे लागले आहे. यासाठी सरकारने ८ हजार ६९६ कोटी रुपये वाटप केले आहेत तर यंदा ही मदत एक हजार ६११ कोटी रुपये आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांचा यात समावेश जास्त आहे.

सध्या शेतकऱ्यांना गोगलगायींच्या आक्रमणाने हैराण केले असून संभाजी नगर विभागात ६३ हजार हेक्टर पिकांचे गोगलगायीमुळे नुकसान झाले आहे. यासाठी सरकारने एक लाख ६ हजार १२ शेतकऱ्यांना ९८ कोटी ५८ लाख रुपये मदत केली आहे. शेतकऱ्यांसाठी शिंदे, फडणवीस, पवार सरकारने काय केले आहे या विरोधकांच्या प्रश्नाला दसऱ्या मेळाव्यात या आकडेवारीने उत्तर दिले जाण्याची शक्यता आहे.. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टी, सततचा पाऊस आणि शेतीवरील कीड नुकसान भरपाईपोटी ८ हजार ६९६ कोटी रुपये ८४ लाख ९५ हजार ९८७ शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये राज्य शासनाने सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती असल्याचा निर्णय घेतला आहे. महसुल विभागात २४ तासात ६५ मि.मि पेक्षा जास्त पाऊस पडल्यास त्या महसुल क्षेत्रातील सर्व गावांना या निर्णयाचा फायदा होत आहे. त्यामुळे नुकसान भरपाईची ही संख्या वाढली असून ६२ लाख ९४ हजार हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे.

### इंडियन पॅनोरमा विभागात एकाही मराठी चित्रपटाला स्थान नाही

# गोव्यातील 'इफ्फी महोत्सवा'त मराठी चित्रपटांची वानवा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गोवा येथे होणाऱ्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया (इफ्फी) या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात गेली काही वर्षे सातत्याने पाच ते सहा मराठी चित्रपटांची निवड होऊन ते दाखवले जातात. यंदा ५४ व्या इफ्फीमध्ये इंडियन पॅनोरमा विभागात निवड झालेल्या अधिकृत यादीत एकाही मराठी चित्रपटाला स्थान मिळालेले नाही. कथाबाह्य चित्रपट विभागातील तीन लघुपट सोडले तर चित्रपट विभागात एकाही मराठी चित्रपटाची निवड झालेली नाही.

गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटांनी चित्रपटगृहांतही बऱ्यापैकी आर्थिक यश मिळवले आहे. विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातूनही मराठी चित्रपट सातत्याने पुरस्कार मिळवत आहेत. असे असूनही देशातील प्रतिष्ठित महोत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इफ्फी या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एकाही मराठी चित्रपटाला मान्यता न मिळण्याची नामुष्की ओढवली आहे. इफ्फी महोत्सव यंदा २० ते २८ नोव्हेंबर रोजी पणजी येथे होणार आहे. या महोत्सवासाठी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच 'नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' (एनएफडीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने इंडियन पॅनोरमा विभागातर्फे देशभरातील उत्तम चित्रपटांची निवड केली जाते. या वेळी महोत्सवासाठी निवड झालेल्या २५ विविध भाषिक भारतीय चित्रपटांची आणि कथाबाह्य चित्रपट विभागातील २१ चित्रपटांची यादी इंडियन पॅनोरमाने जाहीर केली. या यादीत सहा मल्याळम, तीन बंगाली आणि इतर कन्नड, तमिळ, हिंदी भाषेतील चित्रपटांचा समावेश आहे. मात्र या यादीत एकाही मराठी चित्रपटाला स्थान मिळवता आले नाही.

कथाबाह्य चित्रपट विभागात सुमिरा रॉय यांचा 'भंगार', प्रथमेश महालेंचा 'प्रदक्षिणा' आणि अभिजीत अरविंद दळवी यांचा 'उत्सवमूर्ती' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. इंडियन पॅनोरमाच्या चित्रपट विभागाच्या परीक्षण समितीतील सदस्यांमध्ये दिग्दर्शक संजय जाधव आणि दिग्दर्शक मिलिंद लेले या मराठी चित्रपटकर्मींचा सहभाग होता. 'गेली काही वर्षे इफ्फी महोत्सवात मराठी चित्रपटांचा डंका वाजलेला आहे. यंदा मात्र मुख्य प्रवाहातील चित्रपट विभागासाठी आलेल्या ११ चित्रपट प्रवेशिकांमध्ये एकही मराठी चित्रपट नव्हता. जे मराठी चित्रपट होते ते स्पर्धेतील इतर चित्रपटांच्या तुलनेत चांगली मते मिळवू शकले नाहीत,' अशी माहिती परीक्षण समितीचे सदस्य मिलिंद लेले यांनी दिली.

## 'इफ्फी'तील मराठी चित्रपट

२०२१ च्या इफ्फी महोत्सवात 'मी वसंतराव', 'बिटरस्वीट', 'गोदावरी', 'फनरल' आणि 'निवास' असे पाच चित्रपट आणि कथाबाह्य चित्रपट विभागात 'मर्मर्स ऑफ जंगल' अशा सहा मराठी चित्रपटांचा समावेश होता. 'गोदावरी' चित्रपटाला महोत्सवात पुरस्कारही मिळाला. गेल्या वर्षीही 'फ्रेम', 'शेर शिवराज', 'एकदा काय झालं', 'धर्मवीर' या चार विविधांगी मांडणी असलेल्या चित्रपटांबरोबर 'रेखा' हा कथाबाह्य विभागातील चित्रपट इफ्फी महोत्सवात दाखवला गेला होता.


## फॉर्म ए
## जाहीर घोषणा

(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाच्या विनियम ६ अंतर्गत)
(कॉर्पोरेट व्यक्तींकरिता नादारी ठराव प्रक्रिया) विनियम, २०१६)

**श्री साईनाथ लँड अँड डेव्हलपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंनी लक्ष देण्याकरिता**

| | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | श्री साईनाथ लँड अँड डेव्हलपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या विधिसंस्थापनाची तारीख | १२ जानेवारी, २०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणको विधिसंस्थापित / नोंदणीकृत आहेत | कंपन्या अधिनियम, १९५६ |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर | यू४५४००एमएच२०११पीटीसी२१२२३१ |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा व प्रधान कार्यालयाचा पत्ता (जर असल्यास) | शॉप नं. यूजी १०९, ड्रीम्स - दि मॉल, एलबीएस मार्ग, भांडुप (प), मुंबई-४०००७८, महाराष्ट्र<br>**कॉर्पोरेट / प्रधान कार्यालय :** ८, साईकृपा कॉम्प्लेक्स, टिळक रोड, नाशिक रोड, मुक्तीधाम समोर, नाशिक-४२२१०१, महाराष्ट्र |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या बाबतीत नादारी सुरू झाल्याची तारीख | २० ऑक्टोबर, २०२३ |
| ७. | नादारी ठराव प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | १७ एप्रिल २०२४ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेल्या नादारी व्यावसायिकेचे नाव व नोंदणी क्रमांक | मनिष मोतीलाल जाजू<br>आयबीबीआय नोंदणी क्र. : आयबीबीआय / आयपीए-००१ / आयपी-पी०००३४ / २०१६-१७ / १००८७ |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार अंतरिम ठराव व्यावसायिकेचा पत्ता व ईमेल | एम एम जाजू अँड कं.<br>डी-५०२, निलकंठ बिझनेस पार्क, विद्याविहार (प), मुंबई-४०००८६. ईमेल :- mmjaju76@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकेशी पत्रव्यवहार करण्याकरिता वापरावयाचा पत्ता व ईमेल | एम एम जाजू अँड कं.<br>डी-५०२, निलकंठ बिझनेस पार्क, विद्याविहार (प), मुंबई-४०००८६. cirp.sainath@gmail.com |
| ११. | दाव्यांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख | ०५ नोव्हेंबर, २०२३ # |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकेद्वारा निश्चित केलेल्या, कलम २१ च्या पोट-कलम (६ए)च्या खंड (बी) अंतर्गत | धनकोंचा वर्ग, जर असल्यास आयबीसी कोडच्या सेक्शन ५(८) च्या खंड (एफ) नुसार रिअल ईस्टेट प्रोजेक्ट अंतर्गत लाभार्थी |
| १३. | वर्गात धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या ज्ञात नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) | १. विठ्ठल एम. दहाके (आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन००११७/ २०१७-१८/११९२६).<br>२. हेमंत मेहता (आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००२७/ २०१६-१७/१००६०).<br>३. अमित कारीया (आयबीबीआय / आयपीए-००१ / आयपी-पी०२६०० / २०२१-२०२२ / १३९६९). |
| १४. | (ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे : | https://ibbi.gov.in/en/home/downloads |

**# अंतरिम ठराव व्यावसायिकाच्या नियुक्तीचा आदेश २० ऑक्टोबर, २०२३ रोजी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल मुंबई बेंच ("एनसीएलटी") द्वारा पाठविला आहे. अंतरिम ठराव २२ ऑक्टोबर, २०२३ रोजी माहीत झाला. तदनुसार, दाव्यांच्या सादरीकरणाकरिता वेळ २२ ऑक्टोबर, २०२३ पासून १४ दिवसांची विचाराधीन आहे.**

याद्वारा सूचना देण्यात येते की, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने **२० ऑक्टोबर, २०२३ रोजी श्री साईनाथ लँड अँड डेव्हलपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडची** कॉर्पोरेट नादारी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.

**श्री साईनाथ लँड अँड डेव्हलपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारा एन्ट्रि नं. १० च्या अनुसार नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे ०५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा तत्पूर्वी [अंतरिम ठराव व्यावसायिकाच्या नियुक्तीपासून येणारे चौदा दिवस] पुराव्यांसह त्यांचे दावे सादर करण्याकरिता फर्माविण्यात आले आहे.

वित्तिय धनको केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पुराव्यासह त्यांचे दावे सादर करतील. अन्य सर्व धनको व्यक्तीशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक प्रणालीत दावे सादर करू शकतील.

वर्गातील असलेले वित्तिय धनको, एन्ट्रि नं. १२ च्या अनुसार सूचीबद्ध असलेले, फॉर्म सीएमधील वर्ग होमबायर्सचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत होण्याकरिता एन्ट्रि नं. १३ च्या अनुसार सूचीबद्ध तीन नादारी व्यावसायिकांमधून त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड सूचीत करतील.

खोटे किंवा दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचे सादरीकरण झाल्यास दंड आकारला जाईल.

स्वाक्षरी/-
**मनिष एम जाजू**
श्री साईनाथ लँड अँड डेव्हलपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणातील अंतरिम ठराव व्यावसायिक

दिनांक : २५ ऑक्टोबर २०२३ आयबीबीआय नोंदणी क्र : आयबीबीआय / आयपीए-००१ / आयपी-पी०००३४ / २०१६-१७ / १००८७
स्थळ : मुंबई एएफए वैधता १७/०१/२०२४ पर्यंत


# याचिकेत एनसीबीला प्रतिवादी का केले नाही; उच्च न्यायालयाची विचारणा

## कॉर्डिलिया क्रुझवरील अमलीपदार्थ पार्टी प्रकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कॉर्डिलिया क्रुझवरील अमलीपदार्थ पार्टी प्रकरणाचा केंद्रीय अमलीपदार्थ विभागातर्फे (एनसीबी) तपास केला जात आहे. असे असताना एनसीबीचे माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या आणि न्यायव्यवस्थेवरही गंभीर आरोप करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी याचिकेत एनसीबीला प्रतिवादी का केले नाही, अशी विचारणा उच्च न्यायालयाने सोमवारी केली. तसेच याबाबत दोन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणाचा तपास एनसीबी करत आहे. शिवाय जप्त केलेला माल, त्याबाबतच्या नोंदी, सर्व कागदोपत्री माहिती एनसीबीच्या ताब्यात आहे. त्यामुळे, याचिकेत एनसीबीला प्रतिवादी का करण्यात आले नाही, अशी विचारणा न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने केली. मात्र, हे प्रकरण आणि आरोप एनसीबीशी संबंधित असल्याची बाब सीबीआयच्या वतीने वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.


**दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लिमिटेड**
**(भारत सरकार उपक्रम)**
**मुंबई क्षेत्रीय कार्यालय ३ -६ वा मजला, टाऊन सेंटर, टॉवर-१, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९ फोन नं. : ०२२-४१०४२२०१**
**IRDA पंजी. नं. ५५६, CIN U6610DL1947GOI007158**

**नोटिस**

सर्व पॉलिसीधारक/हित धारक आणि सामान्य जनतेला सूचित करत आहोत कि महाराष्ट्र राज्यामध्ये स्थित **मुंबई क्षेत्रीय कार्यालय - ३** अंतर्गत येणाऱ्या खालील कार्यालयाला पुनर्गठित केले जात आहे आणि आई.आर.डी.ए. नियमां (व्यवसाय नियम चे स्थान २०१५) च्या अनुसार दि. २४ डिसेंबर २०२३ पासून तेथून काम सुरू केले जाईल. पॉलिसी/दावे किंवा अन्य सेवा खालील कोष्टकामध्ये दाखविलेल्या नवीन कार्यालयाद्वारे प्रदान केल्या जातील.

| पुनर्गठित होणाऱ्या कार्यालयाचे नाव | कार्यालय संकेतांक | सेवा प्रदान केल्या जातील | संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| बीसी-चेंबूर : कार्यालय क्रमांक २०२, २रा मजला अनुराग बिझनेस सेंटर डब्ल्यू. टी. पाटील मार्ग अमर सिनेमा हॉल जवळ चेंबूर पूर्व.-मुंबई पिनकोड- ४०००७१ | १३३२०० | दादर बीओ कार्यालय संकेतांक - १३२९०० लक्ष्मी कमर्शियल सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर मुंबई पिनकोड-४०००२८ | श्रीमती अनिता उचिल, वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक **फोन क्रमांक:** ०२२-४०२२१२८२ **मोबाईल क्रमांक:** ९२२१०३९४७५. **ईमेल-आयडी:** anitauchil@ orientalinsurance.co.in |

**सही / -**
**मुख्य क्षेत्रीय व्यवस्थापक**



**एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** (एक शेड्यूल्ड कमर्शियल बँक)
AU SMALL FINANCE BANK
A SCHEDULED COMMERCIAL BANK
**नोंदणीकृत कार्यालय : १९-ए, धुळेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर - ३०२ ००१, राजस्थान (भारत). (सीआयएन : एल३६९११आरजे१९९६पीएलसी०११३८१)**

**परिशिष्ट-IV-ए** [रुल ८(६)च्या तरतुदी पाहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

आम जनतेस तसेच विशेषकरून ऋणको / सह-ऋणको / गहाणकार व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक / प्रत्यक्ष ताबा **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (एक शेड्युल्ड कमर्शियल बँक)**च्या, सदर बँक यापुढे **"एयूएसएफबी"** म्हणून संदर्भित असेल, प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. सुरक्षित मत्तेची विक्रि **"एयूएसएफबी"** म्हणजेच सुरक्षित धनकोला देय असलेली पुढील व्याज, किंमत, आकार व खर्च यासह खालील तालिकेत नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीकरिता ई-लिलावाद्वारा **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे"** आणि **"जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

याद्वारा तुम्हास कळविण्यात येते की, आम्ही **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटद्वारा जाहीर ई-लिलावाचे आयोजन करणार आहोत.

| लोन अका. नं. / ऋणको / सह-ऋणको / गहाणकार / हमीदाराचे नाव | मागणी सूचना १३(२) ची तारीख व रक्कम | ताब्याची तारीख | मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेकरिता राखीव किंमत | मालमत्तेकरिता इसारा रक्कम | ई-लिलावाची तारीख व वेळ | बोलीच्या सादरीकरणाची तारीख | ई-लिलाव/ निविदा सादरीकरणाचे ठिकाण | संपर्क व्यक्ती आणि मालमत्ता पाहणीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (लोन अका. नं.) : एल९००१०६०११८५२०६९३, रामरतन व्हेजिटेबल्स सप्लायर्स, तिच्या मालका द्वारे - रामरतन (ऋणको), रामरतन रामसेवक गुप्ता, रामसेवक गुप्ता यांचे सुपुत्र (सह-ऋणको व गहाणकार), श्रीमती मीरा रामरतन गुप्ता, रामरतन गुप्ता यांची पत्नी (सह-ऋणको) | २० फेब्रु. २० रु. १५,९०,०८६/- (रुपये पंधरा लाख नव्वद हजार शहाऐंशी फक्त) १४ फेब्रु. २० रोजीप्रमाणे | ०९ मार्च २३ | फ्लॅट नं. ०६, दुसरा मजला, सर्व्हे नं. ९९/ए/१/१बी, सर्व्हे नं. ५८७०/ए/२, श्री पेठकर प्लाझा को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, "बी" विंग, जि. नाशिक-४२२००३, महाराष्ट्र. **मोजमापाचा ६२० चौ.फू.** | रु. १३,१२,०००/- (रुपये तेरा लाख बारा हजार फक्त) | रु. १,३१,२००/- (रुपये एक लाख एकतीस हजार दोनशे फक्त) | **२२ नोव्हें. २३** रोजी दु.०२.०० ते दु.०४.०० ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह | **२० नोव्हें. २३** रोजी किंवा तत्पूर्वी | **एयू स्मॉल फायनान्स बँक लि., शाखेचा पत्ता :** दुसरा मजला, कृष्णा नगर, प्लॉट नं. ५४, थत्ते नगर, कॉलेज रोड, जिल्हा नाशिक-४२२००५, महाराष्ट्र. | रवींद्र देवारे व भानू प्रताप सिंह - ७०३९०५२९३० / ९७७३३५८२३४, ईमेल आयडी : auctions@aubank.in **१७ नोव्हें. २३** |

**ई-लिलाव विक्रीच्या शर्ती व अटी :**

(१) सुरक्षित मत्तेची ई-लिलाव विक्री "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्वावर आणि सुरक्षित धनको म्हणजेच "एयूएसएफबी"च्या वतीने आणि करिता आहे.

(२) ऑनलाइन ई-लिलाव विक्रीमध्ये सहभागी होण्याकरिता बोली कागदपत्रे, पॅन कार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाच्या ठरावाच्या प्रती व फोटो आयडी, पत्त्याचा पुरावा, इ. इरठेसमवेत सादर करणे आवश्यक आहे, "जी एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड"च्या एमएसएमई ऑक्शन पूल अकाउंटच्या नावे आरटीजीएस / एनईएफटी / डीडीद्वारा देय आहे, करंट अकाउंट नं. १९२१२०११२१७११५९९ "एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड", पाचवा व सहावा मजला, सन्नी बिग जंक्शन एसटीसी खासरा नं. ६४ ते ६७, ग्राम सुखाईपुरा, न्यू आतिष मार्केट, जयपूर-३०२०२०, आयएफएससी कोड : एयूबीएल०००२०११. एकदा का बोली ऑनलाईन सादर केल्यास त्या मागे घेता येणार नाहीत. याअधिक बोलीदाराद्वारा कोणतीही सादर केलेली इरठे auctions@aubank.in या ईमेल आयडीवरून कॅन्सल्ड चेकच्या प्रतीसह यूटीआर / संदर्भ क्र. / आरटीजीएसचा डीडी नं. / एनईएफटी / डीडी, इ. पाठविणे आवश्यक आहे.

(३) सर्व इच्छुक सहभागी होणारे / बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्याकरिता शर्ती व अटी समाविष्ट अधिक तपशीलाकरिता https://sarfaesi.auctiontiger.net व https://www.aubank.in/bank-auction या वेबसाइटला भेट द्यावी आणि असासुद्धा सल्ला देण्यात येतो की, त्यांनी श्री. भानू प्रताप सिंह यांच्याशी, संपर्क क्रमांक ९३५८००२६६३ व auctions@aubank.in या ईमेलवरून संपर्क साधावा.

**कृपया नोंद घ्यावी :** ही सूचना पूर्वोक्त तारखेदिवशी निविदा / परस्पर बोलीद्वारा विक्रीबद्दल पूर्वोक्त कर्ज लेखाचे ऋणको/सह-ऋणको/गहाणकारांना रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत १५ दिवसीय सूचनासुद्धा आहे. सूचना कालावधीत दिलेल्या थकीत देणींची ऋणकोद्वारा जर पूर्णतः परतफेड न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल.

**दिनांक : २३.१०.२०२३**
**स्थळ : नाशिक**

**प्राधिकृत अधिकारी**
**एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**


लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
http://mpcb.gov.in
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

## पर्यावरण रक्षणाचा श्री गणेशा !



वर्ष १६ वे

प्रस्तुत

लोकसत्ता
माझी वसुंधरा
इकोफ्रेंडली
घरगुती गणेशोत्सव स्पर्धा-२०२३

सहप्रस्तुती
Majhi Vasundhara 4.0
#majhivasundhara

## 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ' व 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' आणि 'लोकसत्ता' आयोजित 'लोकसत्ता माझी वसुंधरा इकोफ्रेंडली घरगुती गणपती स्पर्धा-२०२३'

**प्रथम पारितोषिक : रु. ९९९९ रोख, द्वितीय पारितोषिक : रु. ६६६६ रोख, उत्तेजनार्थ : रु. २००१ रोख, प्रमाणपत्र व मानचिन्ह**

### हार्दिक अभिनंदन !

**मुंबई विभाग - प्रथम पारितोषिक** : सचिन पाटील, **द्वितीय पारितोषिक** : अमोल वैद्य, **उत्तेजनार्थ** : गिरीश मोकल, अभिषेक चिटणीस, प्रदीप पेडणेकर, अक्षय येवगे, अमित राऊत, अनंत नामे, अतुल खुळे, दीपक कदम, गंगाराम करंजेकर, हेरंब जोशी, हेरंब निर्गुण, जयंत प्रधान, कल्पेश सप्रे, किशोर पाटील, किशोर राजेशिर्के, मकरंद पाठारे, मन रेळे, नरेंद्र धनकरघरे, पराग सावंत, अवीर वडवळकर, प्रशांत कुलकर्णी, रवींद्र पाटील, सचिन साळुंखे, सागर भंडारे, समीर फासे, समृद्धी पवार, श्रीरंग गणपत्ये, संजय कारंडे, संतोष वर्टेकर, श्रवण घोडके, स्वप्नजा अहिरे, अमेय भुसाणे, केयूर सादराणी, जितेंद्र अहिरराव, विकास पाटील, विलास काळसेकर, विशाल पाटील, संतोष पाटील, संजय वर्तक, यश भौड

**पुणे विभाग - प्रथम पारितोषिक** : आकांक्षा अर्चना विद्या महामुने, **द्वितीय पारितोषिक** : राजेश कनिम, **उत्तेजनार्थ** : नितीन दळवी, रूपा बदाद, संध्या दिक्षित, शुभम बानपेल, सोनाली माळवदे, उमाजी बोऱ्हाडे, विवेक केसकर, विवेक किराड, अनिल टिळेकर, सागर हजारे, अनिता जाधव, रिद्धी भागवत

**छत्रपती संभाजीनगर विभाग - प्रथम पारितोषिक** : आर्या ढाकणे, **द्वितीय पारितोषिक** : श्वेता देशमुख, **उत्तेजनार्थ** : शिल्पा सानप, अनिल अदुदे, आरती सदावर्ते, डॉ. अतुल दांडेकर

**नाशिक विभाग - प्रथम पारितोषिक** : अपर्णा नाईक, **द्वितीय पारितोषिक** : पंकज थोरात, **उत्तेजनार्थ** : वसंत ठाकूर, महेंद्र पंगारकर, प्रिती पवार, विशाल फड

**अहमदनगर विभाग - प्रथम पारितोषिक** : नरेंद्र सोनावणे, **द्वितीय पारितोषिक** : भूपाली निसळ, **उत्तेजनार्थ** : अभय गोले, रणजित देशमुख, स्वाती रानडे

**नागपूर विभाग - प्रथम पारितोषिक** : मनस्वी देशमुख, **द्वितीय पारितोषिक** : स्वप्निल कुंभारे, **उत्तेजनार्थ** : राजेंद्र सोनावणे, जय काळबांडे, मनोहर वरवाडे

**पारितोषिक वितरण समारंभाची तारीख व स्थळ स्पर्धकांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.**